चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१७ मार्च, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# हरविलेल्या इसमांपैकी ५३ इसमांचा शोध घेण्यास रामनगर पोलीसांना यश

चंद्रपुर जिल्हयातील रामनगर पोलीस स्टेशन अंतर्गत हरविलेले महिला मुले व प्रोढ यांचा शोध घेण्याकरीता पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामनगर येथे विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये हरविलेले इसमांपैकी एकुण ५३ इसमांचा शोध घेण्यास रामनगर पोलीसांना यश आले आहे.

पोलीस स्टेशन रामनगर येथे हरविलेले (मिसिंग) पुरूष/महिला यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये रामनगर पोलीस स्टेशन येथे दाखल मिसिंग प्रकरणामधील माहे जानेवारी मध्ये ११ महिला आणि ६ पुरूष, माहे फेब्रुवारी मध्ये १४ महिला ८ पुरूष, तर मार्च मध्ये ११ महिला आणि ३ पुरूष असे एकुण आजपावेतो ५३ इसमांचा विशेष मोहिमेअंतर्गत पोलीसांनी शोध घेवुन त्यांना त्यांचे घरी सुखरूप पोहचविले आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर व श्री. प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात श्री. शिलवंत नांदेळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन रामनगर पोनि. श्री. हाके यांचे सह पोहवा. अरूण मोगरे आणि पोशि. आदेश रामकेटे यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

---